| MHLA150010622016 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २६/१२/२०१६ |
| | नोंदणी दिनांक | : | २६/१२/२०१६ |
| | निकाल दिनांक | : | १९/०७/२०२५ |
| | कालावधी | : | ०८ व. ०६म. २०दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात</u>**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.१४२/२०१६**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | संतोष नरसिंग तेलंगे,<br>वय – ३४ वर्ष, धंदा – मजूरी, |
| | २. | मनिषा नरसिंग तेलंगे,<br>वय – ३७ वर्ष, धंदा – घरकाम, |
| | ३. | पंचफुलाबाई नरसिंग तेलंगे,<br>वय –४५ वर्ष, धंदा – घरकाम,<br>सर्व रा. हाळी खु. ता. चाकूर जि.लातूर |
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. एस.व्ही. गंभीरे |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ३०/०५/२०१६ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १४/०६/२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २६/१२/२०१६ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १४/०३/२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १४/०३/२०१८ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १९/०७/२०२५ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्मावविण्याचा दिनांक | - - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संतोष नरसिंग तेलंगे | ३०/१०/२०१६ | ३०/१०/२०१६ | भा दं वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| २ | मनिषा नरसिंग तेलंगे | ०७/११/२०१६ | ०७/११/२०१६ | भा दं वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ३ | पंचफुलाबाई नरसिंग तेलंगे | ०७/११/२०१६ | ०७/११/२०१६ | भा दं वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii)

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

### –अभियोगपक्ष –

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | भगवान गंगाधर शिंदे (नि.३१) | पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | नरसिंग मारोती तेलंगे (नि.३३) | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | लक्ष्मीबाई नरसिंग तेलंगे (नि.क्र ३४) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०४ | मुनिरपाशा उस्मान पटेल शेख (नि.७३) | पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०५ | सचिन नरसिंग तेलंगे (नि.७५) | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०६ | अमर साहेबराव जाधव (नि.७६) | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०७ | खलिल इमाम शेख (नि.७७) | साक्षीदार |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | नि.क्र. ४ | प्रथम खबर अहवाल |
| २ | नि.क्र. ३ | मुद्देमाल पावती |
| ३ | नि.क्र. ३२ | साक्षीदार क्र. १ यांची सही |

| | | |
|---|---|---|
| ४ | नि.क्र. ३७ | फिर्याद |
| ५ | नि.क्र. ७४ | साक्षीदार क्र. ४ यांची सही |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | -- | -- |

**इ. –भौतिक वस्तु–**

| **अनु.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दिनांक १९.०७.२०२५)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२६,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. फिर्यादी नरसिंग मारोती तेलंगे यांना दोन पत्नी नामे लक्ष्मीबाई व आरोपी क्र. ३ पंचफुलाबाई आहेत. फिर्यादी यांची पत्नी लक्ष्मीबाई यांना दैवशाला,

रत्नमाला अशा दोन मुली व एक मुलगा सचिन आहे. पत्नी पंचफुलाबाई यांना आरोपी क्र. १ संतोष व आरोपी क्र. २ मनिषा ही मुले आहेत. घटनेच्या २० वर्षापुर्वीपासुन आरोपी हे फिर्यादी यांच्या घराशेजारी वेगळे राहत आहेत. घटनेच्या दोन वर्षापुर्वी आरोपी हे घराची वाटणी करुन दे म्हणून फिर्यादी यांना विनाकारण शिवीगाळ व धमकी देत असत.

३. दि. ३१.०३.२०१६ रोजी दुपारी १.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांची पत्नी लक्ष्मीबाई हे खंडोबाच्या मंदिराच्या बाजूस सरकारी आडावर पाणी आणण्याकरीता गेले होते. फिर्यादी पुन्हा परत घरी जात असताना खंडोबा मंदिराच्या बाजुच्या रोडवर सर्व आरोपी आले होते. वाटणी का करुन देत नाही म्हणून सर्व आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करु लागले होते. फिर्यादी यांनी आरोपींना भावांच्या वाटण्या झालेल्या नाहीत, भावांच्या वाटण्या झाल्यानंतर वाटणी करुन देतो, असे म्हटले असता, आरोपी क्र. १ संतोष यांनी त्यांच्या हातातील वेळूच्या काठीने फिर्यादी यांना उजव्या डोळ्याच्या भुवईवर मारुन जखमी केले होते. त्यामुळे फिर्यादी चक्कर येवून खाली पडले होते. आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादी यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीच्या पाठीवर वेळूच्या काठीने मारहान केली. त्यानंतर तेथील साक्षीदार खलील पटेल व त्यांची पत्नी हसीना, कमलाबाई शिंदे यांनी ते भांडण सोडवले. साक्षीदार लक्ष्मीबाई व सचिन हे तेथे आले होते. आरोपींनी जाताना फिर्यादी यांना तुला बघुन घेतो, अशी धमकी दिली होती. त्यानंतर साक्षीदार सचिन व लक्ष्मीबाई यांनी फिर्यादी यांना सरकारी दवाखाना चाकूर येथे उपचाराकरीता दाखल केले होते. त्यानंतर फिर्यादी यांना पुढील उपचाराकरीता लातूर येथील दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. दाखल अंमलदार यांनी दि. १२.०६.२०१६ रोजी फिर्यादी यांचा जवाब लातूर येथे नोंदविला होता.

त्यानुसार फिर्यादीने आरोपींविरोधात पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली.

४. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिस ठाणे चाकूर येथे दि.१४.०६.२०१६ रोजी गु.र.क्रमांक १९२/२०१६ भा.दं.वि. कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. एस. डी. बेंबडे, पो.ना. बक्कन नं. १०९६ यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२३,३२५,५०४,५०६ सह कलम ३४ न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. पुर्व पिठासीन अधिकारी यांनी वरील गुन्हयास अनुसरुन आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२६, ५०४,५०६ सह कलम ३४ दोषारोप नि.क्र.२५ नुसार ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांचेवरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.२६ ते २८ दाखल आहे. आरोपींविरुध्दचा पुरावा आल्याने निशाणी क्र. ६१ ते ६३ वर पुर्व पिठासिन अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नोंदविले आहे. त्यामध्ये आरोपी यांनी फिर्यादीसोबत असलेले नाते मान्य केले आहे व इतर बाबी नाकारुन फिर्यादीने गैरसमजुतीतुन खोटी केस केली असे कथन केले आहे.

६. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.३१.०५.२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. मौजे हाळी खु. ता. चाकूर जि. लातूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना काठीने ईच्छापुर्वक जबर दुखापत केली, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | .. नकारार्थी. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात | |

| | | |
|---|---|---|
| | संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | .. नकारार्थी. |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय? | .. नकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता** –

७. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ३ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

८. फिर्यादी नरसिंग मोराती तेलंगे (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपी क्र. १ संतोष हे वारंवार वाटण्याकरीता मागणी करत होते. त्यांनी वाटणी करुन देतो असे म्हटले असता आरोपी ऐकत नव्हते. दि. ३१.०५.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता त्यांच्या गावात खंडोबा मंदिराच्या बाजुला मोकळ्या जागेत तिनही आरोपी आले होते. तेव्हा त्यांनी वाटणीस नकार दिला त्यावेळी आरोपी संतोष यांनी फिर्यादीच्या डोक्यात, पाठीवर काठीने मारुन जखमी केले होते. त्यामुळे त्यांचे डोके फुटले होते. आरोपी संतोष यांनी त्यांच्या डाव्या हाताच्या करंगळीवर काठीने मारले होते. त्यावेळेस त्यांचा दुसरा मुलगा सचिन साक्षीदार लक्ष्मीबाई, कमलबाई व हसिनाबी यांनी ते भांडण सोडवले.

९. पुढे त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, त्यांना चाकूर येथील दवाखान्यातून लातूर येथील दवाखान्यात उपचाराकरीता नेण्यात आले होते. त्या मारहाणीमध्ये त्यांच्या डाव्या हाताची करंगळी वाकडी झाली होती. त्यांनी निशाणी

क्र. ३७ नुसार फिर्याद दिली होती. निशाणी क्र.४ प्रथम खबर अहवाल व नि.क्र. ३७ वरील फिर्यादी यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता घटना ही दि. ३१.०५.२०१६ रोजी घडली होती. व त्यांची फिर्यादी दि. १४.०६.२०१६ रोजी दाखल करण्यात आली होती, असे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये १४ दिवसांचा विलंब फिर्याद देण्याकरीता झाल्याचे दिसून येते. या विलंबाचे कारण फिर्यादीच्या जवाबामध्ये किंवा प्रथम खबर अहवालामध्ये नमूद करण्यात आलेले नाही. जर असे गृहीत धरले की, फिर्यादी हे दवाखान्यामध्ये दाखल होते, त्यामुळे विलंब झाला होता. तर, तशा परिस्थितीमध्ये वैद्यकिय अधिकारी व तपासी अधिकारी यांना तपासणे आवश्यक होते. परंतू निशाणी क्र.८८ नुसार दोन्ही साक्षीदाराविरुध्द जमानती वारंट काढण्यात आले होते. परंतू तपासी अधिकारी मयत झाल्याचे त्यावर नमूद करण्यात आले आहे व वैद्यकीय अधिकारी यांना अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले नाही, अशा परिस्थितीमध्ये विलंबाचे कारण सिध्द करण्यात आलेले नाही.

१०. साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या दि.०३.०२.२०२० मध्ये घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये असे मान्य केले की, त्यांनी आरोपी विरुध्द रागाच्या भरात गैरसमजुतीतुन तक्रार दिली होती. तक्रार देण्याकरीता झालेला विलंब पाहता उलटतपास यातून साक्षीदार क्र. २ यांच्या तोंडी पुराव्यावरती संशय निर्माण होतो. साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्याला दुजोरा देणारा पुरावा अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही.

११. साक्षीदार क्र. ३, ५, ६ व ७ हे या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांना घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे सांगितले. साक्षीदार क्र. ३ यांनी केवळ असे सांगितले की, आरोपी क्र.१ संतोष हे साक्षीदार क्र. २ यांना वाटण्याबाबत सतत मागणी करत होता व त्यांनी वाटणीबाबत हट्ट धरला होता. अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदार अभियोग पक्षास

साथ देत नाही म्हणून, त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले परंतू साक्षीदार क्र. ३, ५, ६ व ७ यांनी ही बाब नाकारली आहे की, दि. ३१.०५.२०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता आरोपी क्र. १ संतोष यांनी फिर्यादी साक्षीदार क्र. २ यांना वेळूच्या काठीने पाठीवरती व डोक्यावरती मारहान केली होती. तसेच हे देखील नाकारले आहे की, आरोपी क्र. २ व ३ यांनी साक्षीदार क्र. २ फिर्यादी यांना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी मारहान केली होती. पुढे त्यांनी ही बाब नाकारली आहे की, आरोपींनी साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. अशा परिस्थितीमध्ये देखील साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्याला दुजोरा देणारा पुरावा आलेला नाही.

१२. सदर प्रकरणातील जखमी फिर्यादी यांनी साधारण १५ ते १६ दिवसानंतर तक्रार दिली आहे. या तक्रारीचे कारण अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले नाही किंवा त्याबाबत कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही. तसेच महत्वाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे अभियोगपक्षास सहकार्य करीत नाहीत. तसेच साक्षीदार क्र. ३ यांनी नि.क्र. ६० वर तडजोडीची पुरशिस दाखल केली आहे. साक्षीदार क्र. २ फिर्यादी यांनी न्यायालया बाहेर तडजोड झाल्याबाबतची पुरशिस नि.क्र.५९ वर दिली आहे. तसेच साक्षीदार क्र. ३,५ ते ७ त्यांच्या पुराव्यात असे कोठेही आले नाही की, आरोपींनी फिर्यादीस काठीने मारहाण करुन जखमी केले, तसेच शिवीगाळ करुन अपमानित केले व जिवे मारण्याची धमकी दिली किंवा कथीत घटना घडली.

१३. वरील सर्व चर्चेवरुन अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार स्वतः फिर्यादी व जखमी साक्षीदार यांनी अभियोगपक्षाला सहकार्य न केल्याने आरोपींनी वर नमुद गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी संतोष नरसिंग तेलंगे, मनिषा नरसिंग तेलंगे आणि पंचफुलाबाई नरसिंग तेलंगे यांना भारतीय दंड विधान कलम ३२६, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक वेळुची काठी मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावी. |
| ३. | आरोपींनी पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे.<br>(सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.07.21 13:46:46 +0530

दिनांक – १९.०७.२०२५

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil J.J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 19/07/2025 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 19/07/2025 |
| Order/Judgment uploaded on | : | 21/07/2025 |